बड़ौदा संग्रहालय अर्थात चित्रसंग्रहालय

---

बड़ौदा म्यूज़ियम आणि चित्र गैलरी (1894) : महाराज सयाजी राव तृतीय ह्यानी तयार केले.देशविदेशात हिंडण्याचा शौक असलेल्या महाराजांनी जिथे जातील तिथून अनेक कलात्मक गोष्टी आणून संग्राहित केल्या. ह्या संग्रहालयातील बहुतांश चित्र महाराजांनी स्वत: गोळा केलेली आहेत. संग्रहालय 1914 मध्ये बनले परंतु त्याचे उद्घाटन 1921मध्ये झाले. पुढे ते अजून विकसित झाले. 1943 मध्ये संग्रहालय आधुनिक ढंगात सुसज्ज झाले व 1948 मध्ये बड़ौदा राज्य मुंबई राज्याच्या अंतर्गत समाविष्ट झाले. त्यानंतर हे संग्रहालय मुंबईच्या शिक्षाविभागामार्फत चालवले गेले .आता ते गुजरात राज्यांतर्गत येते.

ह्या संग्रहालयात भारत, चीन जापान, मिस्त्र, ईराक, फारस, ग्रीस, मरो तसेच मध्ययुगीन योरोपातील कलाकृती संग्रहीत आहेत। भवनाखालील चार खोल्या "यूरोपीय कक्ष" म्हणवल्या जातात. ह्यात ग्रीस व रोमच्या (सातव्या शतकापासून विसाव्या शतकापर्यंत) कलाकृती तसेच योरोपीय कलाकृती आहेत. एक खोली केवळ लघुचित्रे (मिनिएचर्स), छापकाम तथा मुद्रांसाठी आहे. सहा खोल्या आशियातील कलेसाठी आहेत. एका खोलीत केवळ जापानी कलाकृती आहेत तर, दुसरीत तिबेटी आणि नेपाळच्या कलाकृती आहेत. तिसऱ्या खोलीत मिस्त्र आणि बैबिलोन ची कला, चौथीत चीनी कला. पाचव्या खोलीत इस्लामी कला आणि सहाव्या खोलीत फारसी, ईराक, तुर्की, सीरिया, मिस्त्र तसेच स्पेनच्या कलाकृती आहेत. पाच चीत्रासंग्राहालये भारतीय संस्कृती तसेच कलेचे दर्शन घडवते तर एका संग्रहालयात प्रागैतिहासिककाळातील सामुग्री आहे. दुसऱ्या  एका दालनात मौर्यकाळापासून 15व्या शतकापर्यंतची कलात्मक साहित्य आहे. आणखी एक खोली बडोद्याच्या इतिहासाला प्रदर्शित करते. तसेच औद्योगिक कलेला ही एक खोली आहे ज्यात १२व्या शतकानंतरची कला दिसते. शेवटी एक एक खोली बड़ौदा, गुजरात आणि महाराष्ट्राच्या कलांसाठी राखून ठेवल्या आहेत.

१५व्या शतकापासून १८व्या शतकापर्यंतची युरोपीय कला दोन भिन्न खोल्यांमध्ये ठेवल्या आहेत. तसेच १९व्या शतकातील कलेसाठी वेगळी खोली ठेवलेली आहे. आधुनिक भारतीय चित्रकलेसाठी दोन खोल्या आहेत. एक खोली ब्रूनर गैलरी आणि दूसरी रोरिक गैलरीच्या नावे आहेत.

अशा प्रकारे बड़ौदयाचे हे चीत्रसंग्राहालाय अत्यंत समृद्ध आहे. इतकेच नाही तर आधुनिक स्वरूपात सुसज्ज आहे. भारतातील सर्वात समृद्ध चित्रसंग्रहालय म्हणून त्याचा उल्लेख करावा लागे.

मूळ हिंदीचा अनुवाद

साभार:

http://hi.wikipedia.org/wiki/%E0%A4%AD%E0%A4%BE%E0%A4%B0%E0%A4%A4%E0%A5%80%E0%A4%AF_%E0%A4%9A%E0%A4%BF%E0%A4%A4%E0%A5%8D%E0%A4%B0%E0%A4%B6%E0%A4%BE%E0%A4%B2%E0%A4%BE%E0%A4%8F%E0%A4%81